**ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी सहाय्यकारी संस्थांची निवडसुची ( पॅनेल ) करण्याबाबतचे अधिकार जिल्हा परिषदांना प्रदान करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्र. ग्रापापु-१००५/प्र.क्र. १६७ /पापु-०७,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२, दिनांक ५ डिसेंबर, २००५**

**वाचा :** १) शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि., क्र. ग्रापापु-१००२/प्र.क्र.५३७/पापु-०७, दि. ३० मार्च, २००२
२) शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि., क्र. एसओ-२००३/प्र.क्र.५१/पापु-१२, दि. २९ मे, २००३
३) शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि., क्र. ग्रापापु-१००४/प्र.क्र.९७/पापु-०७, दि. २९ मे, २००४

**प्रस्तावना:**

राज्यात राबविण्यात येत असलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमासाठी (क्षेत्र सुधारणा कार्यक्रम, स्वजलधारा, जलस्वराज्य व आपलं पाणी) सेवाभावी संस्थांचा सहभाग मोठया प्रमाणावर आवश्यक आहे. लोक सहभागातून मागणी आधारित तत्वावर राबविण्यात येत असलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमांमध्ये योजनेचे व्यवस्थापन करण्याची क्षमता ठराविक कालावधीत गावामध्ये विकसित करुन योजनांचे संपूर्ण व्यवस्थापन लोकांच्या हाती सोपविण्याचे कार्य नाविन्यपूर्ण रितीने, अधिक कल्पकतेने व प्रभाविरित्या करण्यासाठी सहाय्यकारी संस्थांची निवड करण्याचे धोरण संदर्भित क्र.१ येथील दि. ३० मार्च, २००२ च्या शासन निर्णयान्वये ठरवून देण्यात आले असून, संदर्भिय क्र.२ येथील दि. २९ मे, २००३ च्या शासन निर्णयान्वये जलस्वराज्य प्रकल्पासाठी या सेवाभावी संस्थांची निवडसूची (पॅनल) करण्याबाबतची कार्यपध्दती विहित करण्यात येवून निवडसूची करण्याचे अधिकार जिल्हा स्तरावरील मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीस देण्यात आले आहेत. जिल्हास्तरावरील या समितीने तयार केलेल्या निवडसूचीस राज्य शासनाने अधिस्वीकृती (Accredition) द्यावयाची आहे. मागील २ वर्षात जलस्वराज्य प्रकल्पामधील सहाय्यकारी संस्थांच्या निवडीचा आढावा घेतला असता असे निदर्शनास आले की, सहाय्यकारी संस्थांची निवड करण्याच्या सध्याच्या कार्यपध्दतीमुळे बराच विलंब होत असून, या संदर्भात राज्यातील काही जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेल्या सूचनांनुसार सहाय्यकारी संस्थांची निवडसूची तयार करण्याचे व त्यास अधिस्विकृती देण्याचे संपूर्ण अधिकार जिल्हा स्तरावर देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय -**

प्रस्तावनेत नमुद केलेल्या बाबींचा विचार करुन ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमासाठी जिल्हा स्तरावर आवश्यक असणाऱ्या सहाय्यकारी संस्थांची निवडसूची (पॅनल) तयार करण्याचे अधिकार **मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीस** देण्यात येत असून या समितीने तयार केलेल्या निवडसूचीस अधिस्विकृती (Accredition) देण्याचे अधिकार जिल्हा परिषदेतील **जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीस** प्रदान करण्यात येत आहेत.

२. सहाय्यकारी संस्थांचा निवडसूचीमध्ये समावेश होण्यासाठी पात्रतेच्या अटी दिनांक २९ मे, २००३ च्या शासन निर्णया सोबतच्या **परिशिष्ट-क** नुसार व शासन निर्णय दिनांक २९ मे, २००४ नुसार राहतील.

३. सहाय्यकारी संस्थांची निवडसूची तयार करण्याच्या सर्वसाधारण सूचना दिनांक २९ मे, २००३ च्या शासन निर्णया सोबतच्या **परिशिष्ट-अ** नुसार राहतील. सहाय्यकारी संस्थांची जिल्हास्तरीय निवडसूची तयार करण्यासाठी संबंधित जिल्हयाने जिल्हयातील व राज्यस्तरावरील सर्वाधिक खपाच्या वृत्तपत्रात जाहिरात देण्यात यावी. या जाहिरातीनुसार निवडसूचीमध्ये समाविष्ट होऊ इच्छिणा-या सहाय्यकारी संस्थांकडून विहित नमुन्यातील अर्ज व तपासणी सूची यथायोग्य रितीने भरुन अर्ज विहित दिनांकापर्यंत मागविण्यात यावेत.

४. उपरोक्त कार्यपद्धतीनूसार जिल्हास्तरावर सहाय्यकारी संस्थांची निवडसूची तयार केल्यावर निवडसूचीवरील सहाय्यकारी संस्थांची संख्या कमी पडत असेल तर, याबाबत कोणत्या पर्यायांचा अवलंब करण्यात यावा याचा निर्णय संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी आपल्या स्तरावर घ्यावा.

५. आवश्यकता वाटल्यास, ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची पुर्व परवानगी घेऊन, जिल्हा परिषद्रेमध्ये कार्यरत असलेले चांगले प्रर्वतक (Good Motivator) (उदा. ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, शिक्षक अथवा ग्राम स्तरावरील व्यक्ती/संस्था) यांची मदत ग्रामस्तरावरील क्षमता निर्मितीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना घेता येईल.

६. एखाद्या जिल्हयामध्ये सहाय्यकारी संस्थांकडून निवडसूची तयार करण्यासाठी योग्य प्रतिसाद मिळाला नाही व योग्य तांत्रिक अनुभव असलेल्या सहाय्यकारी संस्था उपलब्ध झाल्या नाहीत तर, अशा जिल्हयांमध्ये तांत्रिक कामे भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा अथवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडून करुन घेण्यास मुभा देण्यात येत आहे. फक्त सामाजिक कामे सहाय्यकारी संस्थांकडून करून घेण्यात यावीत. तांत्रिक कामे करुन घेण्यासाठी भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा अथवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अभियंत्यांची निवड, नियुक्ती व त्यांची देयेके अदा करणे हे संबंधित गावच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती मार्फत करण्यात यावे.

७. हा शासन निर्णय राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छतेच्या क्षेत्रातील सर्व प्रकल्पांसाठी व योजनांसाठी लागू राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

संजीव कुमार
(संजीव कुमार) 5.12.05
उपसचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव
२) मा. राज्यमंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव
३) प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
४) प्रधान सचिव (ग्रामविकास), ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
५) महासंचालक (आरोग्य सेवा), आरोग्य महासंचालनालय, मुंबई.
६) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
७) विभागीय आयुक्त ( सर्व )
८) आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
९) जिल्हाधिकारी (सर्व)
१०) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ( सर्व )
११) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ( सर्व )
१२) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद ( सर्व )
१३) कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद ( सर्व )
१४) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद ( सर्व )
१५) जिल्हा शिक्षण अधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद ( सर्व )
१६) जिल्हा महिला व बाल कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद ( सर्व )
१७) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद ( सर्व )
१८) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद ( सर्व )
१९) प्रकल्प व्यवस्थापक , (जागतिक बँक प्रकल्प) आर.एस.पी.एम.यु.
२०) प्रकल्प अधिकारी, (केएफडब्ल्यू प्रकल्प), आर.एस.पी.एम.यु.
२१) मनुष्यबळ विकास तज्ञ, (प्र.नि.सं.क.), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
२२) विशेष कार्य अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
२३) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील कार्यासन क्र. पा.पु.११ /पा.पु.१६/पा.पु.२१
२४) निवड नस्ती , पा.पु.०७

------